# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट ३८१-२२** **दिनांक ०९/१२/२०२२**

## बाल-मजुरांकडुन काम करुन घेणा-या इसमास अटक करुन ०३ बाल मजुरांची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी.

दि. ०८.१२.२०२२ रोजी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना त्यांचे बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, गाळा नं ०८ बी, पारस इंटरप्राईजेस, उद्योग इंट्रस्ट्रीयल इस्टेट, मच्छी मार्केट जवळ, बी.पी.क्रास रोड नं.०३, नवघर, भाईंदर पुर्व या ठिकाणी अल्पवयीन मुलांकडुन इलेक्ट्रीक लोखंडी प्रेस, कटींग व इलेक्ट्रीक भट्टी मशीनवर अनधिकृतपणे कामावर ठेवून त्यांचेकडून सक्तीने बेकायदेशीर धोकादायक तसेच जिवीतास धोका होईल असे काम करुन घेत आहेत.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोनि. समीर अहिरराव व स्टाफ यांनी पंचासह गाळा नं ०८ बी, पारस इंटरप्राईजेस, उद्योग इंट्रस्ट्रीयल इस्टेट, मच्छी मार्केट जवळ, बी.पी.क्रास रोड नं.०३, नवघर, भाईंदर (पुर्व) या ठिकाणी पोलीस पथकासह १६.१५ वा. छापा कारवाई केली असता ०३ अल्पवयीन मुले स्टीलचे कंपनीमध्ये इलेक्ट्रीक लोखंडी भट्टी, प्रेस व कटींग मशीनवर जिवितास धोका होईल असे काम करत असतांना मिळुन आल्याने त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टिने ताब्यात घेण्यात आले. सदरबाबत कंपनीचा मॅनेजर किसनकुमार यमुनाशंकर यादव, वय-५० वर्ष यास ताब्यात घेवुन मॅनेजर व मालक (पाहिजे आरोपी ) यांचे विरुध्द नवघर पोलीस ठाणेस गुन्हा रजि. नं. I ९४५/२०२२ भा.द.वि.कलम ३७४,३४ सह बाल व किशोरवयीन (प्रतिबंध) सुधारीत कायदा २०१६ चे कलम ३ (ए) सह बाल न्याय अधिनियम ७५,७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, सपोउनि. उमेश पाटील, विजय निलंगे, पो.शि. केशव शिंदे, चालक पो.हवा. सम्राट गावडे, नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर व म.पो.हवा. नम्रिता यादव- मुनष्यवध तपास पथक यांनी केली आहे.

-----ooo----